लोकमत

# कुलसचिवपदाची निवड प्रक्रिया पुन्हा सुरू

## शिवाजी विद्यापीठ : ऑनलाईन अर्ज मागविले

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : पात्र-अपात्रतेच्या मुद्द्यावरून उमेदवारांनी नोंदविलेला आक्षेप आणि त्यानंतर १७ जणांच्या मुलाखती होऊनही एकही उमेदवार पात्र नसल्याचे सांगत गेल्या महिन्यात निवड समितीने शिवाजी विद्यापीठाच्या कुलसचिवपदाची निवड प्रक्रिया नव्याने राबविण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार विद्यापीठ प्रशासनाने प्रक्रिया पुन्हा सुरू केली. कुलसचिव आणि आंतरविद्याशाखा अधिष्ठातापदासाठी ऑनलाईन अर्ज मागविले आहेत.

कुलसचिव पदासाठी गेल्या सात महिन्यांपासून निवड प्रक्रिया सुरू होती. या पदासाठीचे अर्ज अपात्र ठरवण्यावरून बरेच रामायण घडले. डॉ. नांदवडेकर, माजी परीक्षा संचालक महेश काकडे, आदींनी थेट राज्यपालांकडे तक्रार केली. त्यानंतर प्रशासनाने त्रुटींची पूर्तता करून घेऊन या तिघांना पात्र ठरवून मुलाखतीसाठी बोलावले. या पदासाठी अर्ज केलेल्या २७ पैकी १७ जणांनी दि. ४ जून रोजी मुलाखती झाल्या. मात्र, निवड समितीने एकही उमेदवार पात्र नसल्याचा अहवाल देत नव्याने प्रक्रिया राबविण्याचा निर्णय घेतला. दि. १८ ऑगस्टपर्यंत ऑनलाईन अर्ज मागविले आहेत.



### आणखी एक पूर्णवेळ अधिष्ठाता मिळणार

विज्ञान आणि तंत्रज्ञान, वाणिज्य आणि व्यवस्थापन या शाखांसाठी पूर्णवेळ अधिष्ठाता निवडीसाठी दि. १३ व १४ जून रोजी मुलाखतीची प्रक्रिया झाली. त्यातून अनुक्रमे डॉ. आर. के. कामत, डॉ. एस. एस. महाजन यांची निवड झाली. सध्या आंतरविद्याशाखा अभ्यासक्रम, मानव्यविद्या शाखेचे अधिष्ठाता प्रभारी आहेत. आंतरविद्याशाखा अधिष्ठाता निवडीची प्रक्रिया आता विद्यापीठाने सुरू केली आहे. त्यामुळे आणखी एक पूर्णवेळ अधिष्ठाता मिळेल.

21 JUL 2022

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाकडून निवड : ५ ऑगस्ट रोजी वितरण

# वसंत डहाके, दिशा शेख यांना 'काळसेकर काव्य पुरस्कार'

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाने यावर्षीचा 'सतीश काळसेकर काव्य पुरस्कार' अमरावती येथील ज्येष्ठ कवी आणि साहित्यिक वसंत आबाजी डहाके यांना, तर 'ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्कार' श्रीरामपूर (जि. अहमदनगर) येथील दिशा पिंकी शेख यांना जाहीर केला आहे. विद्यापीठात दि. ५ ऑगस्ट रोजी दुपारी ४ वाजता कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्रा. अविनाश सप्रे यांच्या हस्ते या पुरस्कारांचे वितरण होणार आहे, अशी माहिती मराठी अधिविभागप्रमुख प्रा. रणधीर शिंदे यांनी बुधवारी दिली.



वसंत डहाके



दिशा पिंकी शेख

## देणगीतून पुरस्कारांची निर्मिती

सतीश काळसेकर यांच्या कुटुंबीयांनी दिलेल्या देणगीतून विद्यापीठातर्फे प्रतिवर्षी दोन पुरस्कार दिले जातात. काव्यक्षेत्रात मौलिक योगदान देणाऱ्या कवीस दरवर्षी 'सतीश काळसेकर काव्य पुरस्कार' आणि नव्या पिढीतील कवीस 'ऋत्विज काळसेकर पुरस्कारा'ने सन्मानित केले जाते. कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या अध्यक्षतेखालील पुरस्कार निवड समितीमध्ये प्रा. अविनाश सप्रे, डॉ. नितीन रिंढे (मुंबई), डॉ. गोविंद काजरेकर (सावंतवाडी) यांनी काम पाहिले.

कवी सतीश काळसेकर आणि ऋत्विज काळसेकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हे पुरस्कार दिले जातात. अनुक्रमे २१ हजार रुपये आणि १० हजार रुपये, सन्मानचिन्ह असे या पुरस्कारांचे स्वरूप आहे.

वसंत आबाजी डहाके हे साठोत्तरी पिढीतील महत्त्वाचे कवी आहेत. त्यांनी आधुनिकतावादी व राजकीय जाणिवांची लिहिलेली कविता महत्त्वाची आहे. कविता, समीक्षा, कलामीमांसा या क्षेत्रातील त्यांची कामगिरी मौलिक ठरली. कवितेविषयी, काव्यप्रतिती, कविता विसाव्या शतकाची, मराठी साहित्य : इतिहास आणि संस्कृती, मराठी समीक्षेची सद्यःस्थिती अशा महत्त्वपूर्ण समीक्षाग्रंथांचे लेखन त्यांनी केले आहे. अतिशय गांभीर्यपूर्ण आणि चिंतनशील लेखनाबरोबरच त्यांनी ज्ञानकोशनिर्मितीमध्येही मौलिक योगदान दिले आहे.

त्यांच्या या वाङ्मयीन योगदानाबद्दल पहिल्या 'सतीश काळसेकर काव्य पुरस्कारा'साठी निवड केली आहे. दिशा पिंकी शेख या सामाजिक कार्यकर्त्या, आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्या म्हणून सर्वपरिचित आहेत. भारतीय जनजीवनातील लिंगभाव, जातीयवाद, धार्मिक मूलतत्त्ववाद, समूहांच्या अस्मिता, स्त्री-पुरुष नात्यातील गुंतागुंतीचा अनोखा पट त्यांनी आपल्या कवितांतून चित्रित केला असल्याचे डॉ. शिंदे यांनी सांगितले.

पुढारी

# कुलसचिव पदासाठी नव्याने अर्ज प्रक्रिया


**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाने कुलसचिव व आंतरविद्याशाखीय अभ्यास अधिष्ठाता पदासाठी पुन्हा नव्याने जाहिरात प्रसिद्ध केली आहे. त्यानुसार दोन्ही पदांसाठी अर्ज करण्याची मुदत १८ ऑगस्टपर्यंत देण्यात आली आहे.

कुलसचिवपदासाठी अर्ज प्रक्रिया राबविण्यात आली. यात २१ जण पात्र तर ३० जणांना अपात्र ठरविले गेले. काही उमेदवारांनी राज्यपाल, कुलगुरूंकडे तक्रारी अर्ज केले. यातील सहा उमेदवारांना कुलगुरूंनी मुलाखतीसाठी बोलाविले. कुलसचिव पदासाठी ४ जूनला मुलाखती घेण्यात आल्या. मात्र, निवड समितीने २१ उमेदवारांमधील एकही उमेदवाराची निवड न करता पुन्हा अर्ज प्रक्रिया राबविण्याची सूचना केल्याने पुन्हा जाहिरात प्रसिद्ध झाली आहे. १८ ऑगस्टपर्यंत अर्ज करण्याची तर कागदपत्र जमा करण्याची मुदत २९ ऑगस्ट आहे.

पुढारी

# 'काळसेकर' काव्य पुरस्कार डहाके, शेख यांना जाहीर



वसंत डहाके



दिशा पिंकी शेख

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने देण्यात येणारा सन २०२२ चा 'सतीश काळसेकर काव्य पुरस्कार' ज्येष्ठ कवी व साहित्यिक वसंत आबाजी डहाके (अमरावती) यांना, तर 'ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्कार' दिशा पिंकी शेख (श्रीरामपूर) यांना जाहीर करण्यात आला आहेत. पुरस्कार वितरण ५ ऑगस्ट रोजी दुपारी ४ वाजता, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्रा. अविनाश सप्रे यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती मराठी विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी कळविली आहे.

कवी सतीश काळसेकर व ऋत्विज काळसेकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हे पुरस्कार देण्यात येतात. अनुक्रमे रुपये २१ हजार, १० हजार रुपये आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्कारांचे स्वरूप आहे. सतीश काळसेकर यांच्या कुटुंबीयांनी दिलेल्या देणगीतून शिवाजी विद्यापीठातर्फे प्रतिवर्षी दोन पुरस्कार दिले जातात.

वाङ्मयीन योगदानाबद्दल पहिल्या 'सतीश काळसेकर काव्य पुरस्कारा'साठी वसंत आबाजी डहाके यांची निवड केली आहे. दिशा पिंकी शेख यांनी भारतीय जनजीवनातील लिंगभाव, जातीयवाद, धार्मिक मूलतत्त्ववाद, समूहांच्या अस्मिता, स्त्री-पुरुष नात्यातील गुंतागुंतीचा अनोखा पट त्यांनी आपल्या कवितांतून चित्रीत केला आहे. स्त्रियांचे दुःख, तृतीयपंथीयांचे प्रश्न त्यांनी 'कुरूप' या काव्यसंग्रहातून मांडले आहेत.

पुढारी

# विद्यापीठातील उन्हाळी सत्रातील परीक्षा सुरू

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च/एप्रिल २०२२ उन्हाळी सत्रातील एकूण ७४१ अभ्यासक्रमांच्या परीक्षांपैकी विद्यापीठस्तरावरील ५६१ पैकी ७८ परीक्षांना मंगळवार (दि. १९) पासून सुरुवात झाली आहे. बुधवारी ३४ विषयांच्या परीक्षा पार पडल्या. या परीक्षेसाठी एकूण १४,९६२ विद्यार्थी बसले होते.

सकाळ

# कुलसचिव पदासाठी नव्याने प्रक्रिया



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या कुलसचिव पदाच्या नियुक्तीसाठी नव्याने प्रक्रिया राबवण्यात येणार आहे. १८ ऑगस्टपर्यंत ऑनलाईन अर्ज करायचे आहेत. तर २८ ऑगस्टपर्यंत हार्ड कॉपी सादर करायची आहे. त्यानंतर छाननी प्रक्रिया होऊन मुलाखतींसाठी उमेदवारांची नियुक्ती केली जाईल. माजी कुलसचिव विलास नांदवडेकर यांचा कार्यकाळ संपल्यानंतर या पदावर कोणाचाही नियुक्ती केली गेली नाही. पद भरतीसाठी अर्ज मागवून त्यांच्या मुलाखतीही झाल्या पण त्यावेळी कोणाचाही निवड केली गेली नाही. त्यामुळे आता कुलसचिव पदासाठी दुसऱ्यांना निवड प्रक्रिया राबवण्यात येणार आहे. त्याचबरोबर विविध शाखांच्या अधिष्ठाता पदासाठीही अर्ज मागवले आहेत. कुलसचिव पदाच्या मुलाखतीसाठी जी समिती निवडली जाते. त्यात व्यवस्थापन परिषदेतील राज्यपाल नियुक्त सदस्य असतात. मात्र या व्यवस्थापन परिषदेची मुदत पुढील महिन्यात संपणार असून जोपर्यंत नवीन अधिसभा आणि व्यवस्थापन परिषद अस्तित्वात येत नाही तोपर्यंत या मुलाखती होऊ शकणार नाहीत.

सकाळ

# डहाके, शेख यांना काळसेकर पुरस्कार जाहीर

## शिवाजी विद्यापीठातर्फे ५ ऑगस्टला होणार वितरण


कोल्हापूर, ता. २० : शिवाजी विद्यापीठातर्फे देण्यात येणारा २०२२ चा 'सतीश काळसेकर काव्य पुरस्कार' ज्येष्ठ कवी व साहित्यिक वसंत आबाजी डहाके (अमरावती) यांना जाहीर झाला. 'ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्कार' दिशा पिंकी शेख (श्रीरामपूर) यांना देण्यात येणार आहे. ५ ऑगस्ट रोजी पुरस्कार प्रदान सोहळा होणार आहे, अशी माहिती मराठी विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी दिली.

काळसेकर कुटुंबीयांनी दिलेल्या देणगीतून शिवाजी विद्यापीठातर्फे प्रतिवर्षी हे दोन पुरस्कार दिले जातात. काव्यक्षेत्रात मौलिक योगदान देणाऱ्या कवीस दरवर्षी 'सतीश काळसेकर काव्य पुरस्कार', तर नव्या पिढीतील कवीस 'ऋत्विज काळसेकर पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात येणार आहे. अनुक्रमे २१ हजार व १० हजार रुपये रोख आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्कारांचे स्वरूप आहे.

वसंत आबाजी डहाके हे प्रसिद्ध कवी, कादंबरीकार, समीक्षक, ललित गद्यलेखक व संपादक म्हणून परिचित आहेत. साठोत्तरी पिढीतील ते महत्त्वाचे कवी आहेत. त्यांनी आधुनिकतावादी व राजकीय



दिशा शेख



वसंत डहाके

जाणिवांची लिहिलेली कविता महत्त्वाची आहे. लघुनियतकालिक चळवळीत त्यांचा महत्त्वाचा असा सहभाग होता. कविता, समीक्षा, कलामीमांसा या क्षेत्रातील त्यांची कामगिरी मौलिक ठरली. ज्ञानकोशनिर्मितीमध्येही मौलिक योगदान आहे. दिशा पिंकी शेख या आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्या म्हणून सर्वपरिचित आहेत. भारतीय जनजीवनातील लिंगभाव, जातीयवाद, धार्मिक मूलतत्त्ववाद, समूहांच्या अस्मिता, स्त्री-पुरुष नात्यातील गुंतागुंतीचा अनोखा पट त्यांनी कवितांतून चित्रित केला आहे. पारलिंगी समूहातील स्त्रियांचे दुःख, तृतीयपंथीयांचे प्रश्न त्यांनी 'कुरूप' या काव्यसंग्रहातून मांडले आहेत. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखालील पुरस्कार निवड समितीत प्रा. अविनाश सप्रे, डॉ. नितीन रिंढे (मुंबई) आणि डॉ. गोविंद काजरेकर (सावंतवाडी) यांनी काम पाहिले.

जनसंपर्क कक्ष
21 JUL 2022 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कुलसचिव पदाची निवड प्रक्रिया पुन्हा सुरु

## मुलाखतीतील एकही उमेदवार पात्र नसल्याचा अहवाल



- पुन्हा निवड प्रक्रिया राबवण्याचा निर्णय
- इच्छुकांना ऑनलाईन अर्ज भरण्यास १८ ऑगस्टपर्यंत मुदत

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या कुलसचिव पदासाठी ४ जूनला मुलाखती झाल्या. परंतू या मुलाखतीला आलेल्या १७ उमेदवारांपैकी एकही उमेदवार पात्र नसल्याचे निवड समितीने जाहीर करुन पुन्हा कुलसचिव पदाची निवड प्रक्रिया राबवण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार कुलसचिव पदाच्या निवड प्रक्रियेला प्रारंभ झाला आहे. इच्छुक उमेदवारांनी १८ ऑगस्टपर्यंत कुलसचिव पदासाठी ऑनलाईन अर्ज भरायचा आहे. तर २९ ऑगस्टपर्यंत भरलेल्या अर्जाची प्रिंट पूरक कागदपत्रांसह विद्यापीठात जमा करावयाची आहे.

शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांचा कार्यकाल संपल्यानंतर कुलसचिव पदाची निवड प्रक्रिया सात महिने सुरु होती. चार उमेदवारांचे अर्ज अपात्र केल्याने ही निवड प्रक्रिया पात्र–अपात्रतेवरून बरीच गाजली. अर्ज अपात्र ठरवल्याने अगदी राज्यपालांपर्यंत तक्रारी गेल्या. अखेर तृटींची पुर्तता करीत तक्रारदारांना मुलाखत देण्यास विद्यापीठ प्रशासनाने परवानगी दिली. अखेर ४ जून रोजी १७ जणांनी मुलाखत दिली. परंतू कुलसचिव निवड समितीने आपले अधिकार वापरत एकही उमेदवार पात्र नसल्याचे जाहीर केले. त्यामुळे विद्यापीठ प्रशासनाने पुन्हा कुलसचिव पदाच्या निवड प्रक्रियेला सुरुवात केली आहे. १८ ऑगस्टपर्यंत पात्र उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरायचा आहे. तर २९ ऑगस्टपर्यंत पूरक कागदपत्रांसह जमा करायचा आहे. ज्या उमेदवारांना ४ जून रोजी दिलेल्या मुलाखतीत अपात्र ठरवले ते उमेदवार पुन्हा अर्ज करणार का? याकडे विद्यापीठ वर्तुळाचे लक्ष लागले आहे.


जनसंपर्क कक्ष
21 JUL 2022 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाचा सतीश काळसेकर पुरस्कार जाहीर

## वसंत आबाजी डहाके, दिशा पिंकी शेख पुरस्काराचे मानकरी : ५ ऑगस्ट रोजी होणार वितरण

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने देण्यात येणारा सन २०२२ चा 'सतीश काळसेकर काव्य पुरस्कार' ज्येष्ठ कवी व साहित्यिक वसंत आबाजी डहाके (अमरावती) यांना, तर 'ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्कार" दिशा पिंकी शेख (श्रीरामपूर) यांना जाहीर करण्यात आला आहे. पुरस्कार प्रदान सोहळा ५ ऑगस्ट रोजी दुपारी ४ वाजता होणार आहे. कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के व प्रा. अविनाश सप्रे हे या पुरस्काराचे प्रमुख पाहुणे असतील, अशी माहिती मराठी विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे ,यांनी दिली.



वसंत आबाजी डहाके, दिशा पिंकी शेख

कवी सतीश काळसेकर व ऋत्विज काळसेकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हे पुरस्कार देण्यात येतात. अनुक्रमे २१ हजार व १० हजार आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्कारांचे स्वरुप आहे. सतीश काळसेकर यांच्या कुटुंबियांनी दिलेल्या देणगीतून शिवाजी विद्यापीठातर्फे प्रतिवर्षी दोन पुरस्कार देण्यात येतात. काव्यक्षेत्रात मौलिक योगदान देणाऱ्या कवीस दर वर्षी 'सतीश काळसेकर काव्य पुरस्कार', तर नव्या पिढीतील कवीस 'ऋत्विज काळसेकर पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात येणार आहे. कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखालील पुरस्कार निवड समितीमध्ये प्रा. अविनाश सप्रे, डॉ. नितीन रिंढे (मुंबई) आणि डॉ. गोविंद काजरेकर (सावंतवाडी) यांनी पुरस्कार निवडीचे काम पाहिले.

### वसंत आबाजी डहाके यांचा परिचय

वसंत आबाजी डहाके प्रसिद्ध कवी, कादंबरीकार, समीक्षक, ललित गद्यलेखक व संपादक म्हणून परिचित आहेत. त्यांनी आधुनिकतावादी व राजकीय जाणिवांची लिहिलेली कविता महत्त्वाची आहे. त्यांच्या या वाङ्मयीन योगदानाबद्दल पहिल्या 'सतीश काळसेकर काव्य पुरस्कारा'साठी वसंत आबाजी डहाके यांची निवड केली आहे.

### दिशा पिंकी शेख यांचा परिचय

दिशा पिंकी शेख या सामाजिक व आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्या म्हणून सर्वपरिचित आहेत. पारलिंगी समूहातील स्त्रियांचे दुःख, तृतीयपंथीयांचे प्रश्न त्यांनी 'कुरूप' या काव्यसंग्रहातून मांडलेत. त्यामुळे त्यांची या पुरस्कारासाठी निवड झाली आहे.

तरुण भारत

# वस्तुनिष्ठ ऑफलाईन परीक्षा सुरळीत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत मार्च -एप्रिल उन्हाळी ऑफलाईन वस्तुनिष्ठ परीक्षा दोन दिवसांपासून सुरू आहेत. ५६१ परीक्षांपैकी ३४ विषयांच्या ७८ परीक्षा पार पडल्या असून १४९६२ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. या परीक्षा सुरळीत पार पडल्या, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. ए. एन. जाधव यांनी दिली. विद्यापीठ अंतर्गत उन्हाळी वस्तुनिष्ठ ऑफलाईन परीक्षांना मंगळवारपासून सुरूवात झाली. बी. एस्सी. कॉम्प्युटर सायन्स, फुड सायन्स ॲन्ड टेक्नॉलॉजी, शुगर टेक्नॉलॉजी, एन्व्हायर्न्मेंट सायन्स, आयटी, बीकॉम आयटी, बिजनेस मॅनेजमेंट, बी. व्होक टुरिझम ॲन्ड सर्व्हीस इंडस्ट्री, ॲटोमोबाईल, मीडिया एन्व्हायर्न्मेंट मेंट, सस्टेनेबल ॲग्रीकल्चर, बी. ए. मल्टीमीडिया, ड्रेस मेकिंग ॲन्ड फॅशन को-ऑर्डिनेशन, बीजी डिप्लोमा यासह आदी विषयांची परीक्षा झाली.